International Journal of Applied Research 2020; 6(5): 177-178




**ISSN Print:** 2394-7500
**ISSN Online:** 2394-5869
**Impact Factor:** 5.2
IJAR 2020; 6(5): 177-178
www.allresearchjournal.com
Received: 09-03-2020
Accepted: 24-04-2020

**Pavan Somnathappa Girwalkar**
Department of Social Work,
Manavlok Social Work College
Ambajogai, Beed, Maharashtra,
India

**Corresponding Author:**
**Pavan Somnathappa Girwalkar**
Department of Social Work,
Manavlok Social Work College
Ambajogai, Beed, Maharashtra,
India

# अंबाजोगाई शहरातील युवकांचा व्यवसायाकड पाहण्याचा दृष्टीकोण

## Pavan Somnathappa Girwalkar

### प्रस्तावना

'उडत्या पाखराची पिसं ज्याला मोजता येतात तोच या जगामध्ये यशस्वी होऊ शकतो'. याचा अर्थ बदलत्या काळाची चाहूल ज्यांना योग्य वेळी घेता येते आणि त्याला अनूसरुन जे अचूक पावलं टाकू शकतात, तेच विजय पताका मिरवू शकतात. नव्या सहस्त्रकात विविध प्रकारच्या आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक बदलामुळे, व्यवसायाची अनेक पारंपारिक क्षेत्र हे लयास गेली आहेतृ तर अनेक नविन क्षेत्र उदयास आली आहेत.
सुशिक्षित बेरोजगारीचा कारखाना निर्माण झाला असून, युवकामधील लवचिकता व सहनशिलता कमी होऊ लागली आहे. तसेच युवकाची जीवनशैली ही बदलली आहे या सर्वांचा परिणाम हा रोजगाराच्या तुटवडयावर होऊ लागला आहे. यामुळे जास्त युवक नोकरीच्या मागे लागले असून, शिक्षण म्हणजे नोकरी असा समज होत आहे आणि या समजण्याचा परिणाम आधुनिक व्यवसायाकडे बघण्यात दिसून येत आहे.

### ऐतिहासिक पार्श्वभुमी

प्राचीन काळापासूनचा विचार केला तर भारतामध्ये चार प्रकारचे वर्ग होते. ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य, शुद्र यापदतीने समाज व्यवस्था चालवली जात असे. ब्राम्हण वर्गाचे रक्षण करण्यासाठी क्षत्रियांना शस्त्र किंवा लढायला लागणारी अवजारे, वैश्य समाजाचे लोक वस्तू निर्माण करायचे आणि इतर कामे शुद्र लोक करत असत. अलिकडचा काळ पाहिला गेला तर राजे, शेतकरी, बलुतेदार, शुद्र असा राज्य चालवण्यासाठी शेतकरी शेतीकरुन कर देत असे आणि शेतकऱ्यांना लागणारी शेती अवजारे हे बारा बलुतेदार असणारे लोक निर्माण करीत आणि या सर्वांची कामे शुद्र करीत असत. प्राचीन काळापासून भारतीय लोक व्यवसायाला (पारंपारिक) महत्व देत असल्याचे दिसते आणि यातून राज्यकारभार पाहत असत. परंतू अलिकडच्या आधुनिक काळात पाहिलं गेल तर या सर्व बलुतेदारांच्या रोजगाराची जागा प्लास्टीक वस्तु, लोखंडी वस्तु, मोठमोठया कंपन्या यांनी घेतलेली दिसते.
यामुळे सर्व लोकांचे आकर्षण हे आधुनिकीकरणातल्या वस्तुकडे जावू लागले आणि पारंपारिक व्यवसाय मोडला जावू लागला. यामुळे युवकांचा कल हा नोकरीकडे वाढू लागला. सर्वांनाच नोकरी मिळणे शक्य नसल्यामुळे युवकांमध्ये बेरोजगारी निर्माण होऊ लागली आणि व्यवसायाकडे बघण्याचा दृष्टीकोनही नकारात्मक होऊ लागला.

### संशोधन पध्दत

प्रस्तुत संशोधन हे मुलाखत अनुसूचित नुसार करण्यात आले असून अंबाजोगाई शहरातील एकुण लोकसंख्येपैकी नमुना म्हणून 15 युवकांच्या प्रत्यक्ष मुलाखती घेण्यात आल्या आहेत.

### देश

1. आधुनिक व्यवसायाकडे तरुणांचा पाहण्याचा दृष्टीकोनाचे अध्ययन करणे.
2. पारंपारिक व्यवसायाकडे तरुणांचा पाहण्याचा दृष्टीकोनाचे अध्ययन करणे.

### गृहितके

1. तरुणांना व्यवसाया ऐवजी नोकरी ही फायदेशीर वाटते.
2. आधुनिक व्यवसायाबाबत युवकांना पुरेसे ज्ञान नाही.
3. आधुनिक व्यवसायाबाबत तरुणांच्या मनात नकारात्मक भावना आहे.

**तथ्य संकलन आणि विश्लेषण**




**सारणी** 1.1 **व्यवसाय दर्शविणारी सारणी**

या सारणीवरुन असे दिसून येते की, आज ही अंबाजोगाई शहरातील 46.66% तरुण हे शेती या पारंपारिक व्यवसायावर अवलंबून आहेत. तर सर्वात कमी कुटर उद्योगाकडे वळलेले दिसतात व सुशिक्षीत असून ही शिक्षणाच्या अभावामुळे 19.99% नोकरी या क्षेत्रात उतरलेले आहेत.

तसेच जरीही शेती क्षेत्रात काम करणारे युवक जास्त असले तरी त्यांच्यामध्ये असलेले आधुनिक शेतीचे अपुरे ज्ञान यामुळे शेती सुधारणा कमी असल्याचे दिसते.




**सारणी** 1.2 **युवकांच्या आवडीचे क्षेत्र दर्शविणारी सारणी**.

यावरुन असे दिसून येते की, 40% युवक हे सरकारी नोकरी या अभिलाषेपोटी उद्योग व्यवसाय अथवा पारंपारिक व्यवसायाकडे वळत नाहीत.

तर सध्य परिस्थितीत अंबाजोगाई शहरातील एकूण लोकसंख्येपैकी 50% युवक हे व्यवसाय करण्यासाठी तयार आहेत. परंतु त्यांच्याकडे आर्थिक स्त्रोत व संबंधीत व्यवसायाचे ज्ञान व कौशल्य प्राप्त नसल्यामुळे ते उद्योगाकडे वळताना दिसत नाहीत.

**युवकाची व्याख्या**

1. प्रशांतनगर मधील झालेल्या परिषदेतील युवकांची व्याख्या:
   12 ते 15 वयोगटातील लोकांना युवक असे म्हणतात.
2. वयाचा संदर्भ घेवून जी व्यक्ती 15 ते 35 या वयोगटातील असते त्यांना युवक असे म्हणतात.
3. जो व्यक्ती परिस्थितीवर मात करतो, संकटावर विजय मिळवतो, ज्यांच्यात सातत्याने उत्साहाचे वातावरण असते, आपले भविष्य आपणच बनवू शकतो यावर विश्वास असतो आणि डोळयामध्ये साहसाचे तेज चमकत असते त्याला युवक म्हणतात.

**युवकांचा व्यवसाय बद्दलचे बदलेले दृष्टीकोन**

आज युवकांना व्यवसायाकडे पाहण्याचा दृष्टीकोन हा जशी जीवनशैली बदलत चालली आहे. तशीच त्यांचा दृष्टीकोनही बदलत चालला आहे. हे शास्त्रीय पध्दतीने सिध्द करण्यासाठी मी अंबाजोगाई शहरातील एकूण 15 तरुणांच्या प्रत्यक्ष मुलाखती घेऊन त्यांची पडताळणी करुन अध्ययन केले तेव्हा अनेक बदलांचा दृष्टीकोनातून अनेक मुद्दे समोर आले आहेत ते खालील प्रमाणे:-

1. अंबाजोगाई शहरातील 50% तरुणांना व्यवसाय करण्याची तयारी आहे, परंतू संबंधीत व्यवसायाचे ज्ञान आणि आवश्यक कौशल्य नाही.
2. 75% युवकांना असे वाटते की छोटा ही व्यवसाय करावयाचा असेल तर त्यासाठी 1 लाखापेक्षा जास्त पैसा लागतो, त्यामुळे व्यवसाया ऐवजी नोकरी चांगली.
3. 62% युवकांना असे जाणवले की, आज व्यवसाय करणाऱ्या मुलांना लग्नासाठी मुली पसंसती देत नाहीत.
4. व्यवसायामध्ये स्वत: ची मालकी असते व इच्छेनूसार कामाची वेळ ठरवता येते त्यामुळे व्यवसाय चांगला असे वाटते.
5. पारंपारिक व्यवसायाला आजच्या औद्योगिकीकरणाच्या युगामध्ये जागा नाही, यामुळे पारंपारिक व्यवसाय हा नकोसा वाटतो.
6. सरकारी नोकरीमध्ये मरेपर्यंत पगाराची हमी असते. परंतु व्यवसायात अशी हमी नसून धोकाच असतो.

वरील सर्व मुद्दयांचा वरुन असे स्पष्ट होते की, आजच्या युवकांमध्ये कष्ट घेण्याची तयारी नाही. तसेच संकटाला सामोरे जाण्याची तयारी नाही. तसेच आपण व्यवसायात गुंतलो तर आपणास लग्नासाठी मुलगी मिळणार नाही याची भिती आहे. चैनीचे जीवन जगण्यासासठी नोकरीच बरी या सर्व गोष्टीमुळे आज युवकांमध्ये व्यवसायाबद्दल नकारात्मक भावना निर्माण झाली असल्याचे दिसून येते.

**निष्कर्ष**

1. अंबाजोगाई शहरातील युवकांना व्यवसायाबद्दल रुची आहे. परंतु 66% युवकांना असे वाटते की, व्यवसायाला जास्त गुंतवणूक करावी लागते.
2. अंबाजोगाई शहरातील 27% युवकांनी आयटीआय, कृषी डिप्लोमा यासारखे शिक्षण घेतले आहे परंतू तरीही ते व्यवसाय न करता नोकरीच्या शोधात आहेत.
3. अंबाजोगाई शहातील 59% युवकांना व्यवसायासाठी सरकारी मदत मिळते हेच माहित नाही.

**उपाय योजना**

1. रोजगार निर्मितीबाबतच्या व व्यवसाय कर्जा बाबतच्या अनेक सरकारी योजनेची माहिती युवक शिक्षण घेत असतांनाच देण्यात यावी.
2. युवकांना 4 भिंतींमधील शिक्षणा ऐवजी कलात्मक व त्या-त्या शिक्षण क्षेत्रातील रोजगारांची माहिती द्यावी.

**संदर्भ**


1. भारतातील सामाजिक समस्या लेखक-डॉ.भा.कि. खडसे, प्रकरण 13 बेकरी: यामध्ये ग्रामीण उद्योगांचा होत चाललेला ऱ्हास याचे वर्णन केले आहे.
2. Facebook. To connect with आम्ही कोल्हापूरी जगात भारी:- यामध्ये युवकांना आज व्यवसाय करण्याबाबतची लाज वाटत आहे असे सांगीतले आहे.
3. यावर डॉ.सुहास भास्कर जोशी व विद्या सुहास जोशी यांचे नोकरी, व्यवसाय, नव्या दिशा, नव्या वाटा यापुस्तकांची समरी चा आधार घेतला. यात युवकांचे व्यवसाय याबाबत साचेबंद मन झाले आहे हे सांगीतले आहे.
4. खडसे मा.कि., 2009, भारतातील सामाजीक समस्या, मंगेश प्रकाशन, नागपूर
5. आगलावे प्रदिप, 2015, भारतीय समाज प्रश्न आणि समस्या, श्रीसाईनाथ प्रकाशन, नागपूर
6. साळीवकर संजय, 2016, सामाजीक समस्या आणि समाज सुधार चळवळ, मंगेश प्रकाशन नागपूर